# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:21.02.2026** **वारः शनिवार**

---

1. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अमेरिकेच्या नेतृत्वाखाली होत असलेला आंतरराष्ट्रीय करार- 'पॅक्स सिलिका'चं सदस्यत्व भारतानं स्वीकारलं
2. एआय इम्पॅक्ट शिखर परिषद हे, अनेक आघाड्यांवर मिळालेलं मोठं यश असल्याचं केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन
3. 'मन की बात' कार्यक्रमातून पंतप्रधान उद्या देशवासीयांशी संवाद साधणार
4. महिला आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघ अंतिम फेरीत दाखल आणि
5. टी-20 पुरुष विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत, सुपर एट संघांच्या लढतींना आजपासून सुरुवात.

**पॅक्स सिलिका**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अमेरिकेच्या नेतृत्वाखाली होत असलेला आंतरराष्ट्रीय करार, 'पॅक्स सिलिका'चं सदस्यत्व भारतानं स्वीकारलं आहे. नवी दिल्लीत आयोजित, एआय इम्पॅक्ट परिषदेत या करारावर काल स्वाक्षऱ्या झाल्या. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव आणि अमेरिकेचे भारतातले राजदूत सर्जियो गोर यावेळी उपस्थित होते. आर्थिक आणि तंत्रज्ञान विषयक सहकार्य आणि पुरवठा साखळीला आधार यादृष्टीनं हा करार महत्त्वाचा आहे. या करारामुळे संगणकीय चिप्स सेमीकंडक्टर्स उद्योगात भारताला मोठा फायदा होणार असल्याचा विश्वास, अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला. याबाबत अधिक माहिती देताना वैष्णव म्हणाले....

**भारत पैक्स सिलिका यानि सेमीकंडक्टर इलेक्ट्रॉनिक्स की वैल्यू चैन का हिस्सा बना है जिससे भारत की इलेक्ट्रॉनिक्स इंडस्ट्री को सेमीकंडक्टर इंडस्ट्री को बहुत लाभ होगा जिस तरह से आलरेडी 10 प्लांट भारत में स्थापित होने की प्रक्रिया में है और बहुत जल्दी पहला सेमीकंडक्टर प्लांट कमर्शियल प्रोडक्शन स्टार्ट करेगा भारत में सेमीकंडक्टर की डिजाइन चिप डिजाइन आज सबसे एडवांस त्वो नैनोमीटर की चिप्स भारत में डिजाइन हो रही है। कंप्लीट इको सिस्टम भारत में आ रहा है उसी के लिए पैक्स सिलिका की बहुत इम्पोर्टेंस रहेगी।**

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत इंडिया एआय इम्पॅक्ट समिटच्या निमित्ताने एआय आणि डीपटेक स्टार्टअप्सच्या 16 मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांबरोबर गोलमेज बैठक घेतली. त्यानंतर, त्यांनी लिख्शटेस्टाईन, स्लोव्हाक प्रजासत्ताक, श्रीलंका आणि मॉरिशस या देशांच्या नेत्यांसमवेत द्विपक्षीय बैठका घेतल्या. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस आणि पंतप्रधान मोदी यांच्यातही एक बैठक झाली. यावेळी ग्लोबल साउथशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा झाली.

**वैष्णव-एआय**

एआय इम्पॅक्ट शिखर परिषद हे, अनेक आघाड्यांवर मिळालेलं एक मोठं यश आहे, असं प्रतिपादन केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्लीत माध्यमांशी बोलत होते. या परिषदेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनाला पाच लाखांहून अधिक पर्यटकांनी भेट दिली तसंच जगातील जवळजवळ प्रत्येक प्रमुख एआय

कंपनी यात सहभागी झाली होती, असं ते पुढे म्हणाले. दरम्यान, इंडिया एआय इम्पॅक्ट प्रदर्शनाचा आज शेवटचा दिवस आहे. प्रदर्शक, नवोन्मेषक आणि अभ्यागतांकडून मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे हे प्रदर्शन आणखी एका दिवसासाठी खुलं ठेवण्यात आलं आहे. हे प्रदर्शन आज संध्याकाळी 6 वाजेपर्यंत खुलं राहील.

**<u>काँग्रेस-निषेध</u>**

दरम्यान, काल नवी दिल्लीत, इंडिया एआय इम्पॅक्ट शिखर परिषदेच्या दरम्यान काँग्रेस पक्षाच्या युवा शाखेतर्फे निदर्शनं करण्यात आली. हे कृत्य देशाची प्रतिमा मलिन करण्याचा जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न आहे, अशा शब्दांत भाजपने या कृत्याचा निषेध केला आहे. या प्रकरणी युवक काँग्रेसच्या चार जणांना अटक करण्यात आली असल्याचं भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते डॉक्टर संबीत पात्रा यांनी सांगितलं. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी देखील या घटनेचा निषेध केला आहे.

**<u>एआय सर्वम</u>**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने कृषी क्षेत्रात, अन्न सुरक्षितता, वातावरणातील बदलाला सामोरे जाण्याची क्षमता, महिला सक्षमीकरणासह सर्वांगीण समृध्दी आणण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्लीतील भारत मंडपम् इथं सुरू असलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिट-2026 मधे 'एआय इन ॲग्रिकल्चर' या विषयावरच्या चर्चासत्रात बोलत होते. नाशिकमध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी विकसित करण्यात आलेल्या 'कुंभदूत' या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ॲपचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आलं.

**<u>एआय कृषिपरिषद</u>**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकऱ्याला जागतिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, तसंच शेतीमध्ये नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर व्हावा या उद्देशाने मुंबईत, 22 आणि 23 फेब्रुवारीला, 'जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन' आयोजित करण्यात आलं आहे, अशी माहिती राज्याचे कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. या संमेलनात, कृषि क्षेत्रातले जागतिक तज्ञ, कृषी-तंत्रज्ञान स्टार्टअप्स, गुंतवणूकदार आणि वित्तीय संस्था सहभागी होणार आहेत, असं भरणे यांनी सांगितलं.

**<u>ट्रम्प-न्यायालय</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना, जगातील जवळ जवळ प्रत्येक देशावर एकतर्फी कर लादण्याचा अधिकार नाही असा निर्णय अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. संघीय आणीबाणी अधिकार कायद्याअंतर्गत, 6 विरुद्ध 3 बहुमताने न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. दरम्यान, ट्रम्प यांनी न्यायालयाच्या या निर्णयाला निराशाजनक म्हंटलं आहे. पर्यायी कायद्यांचा वापर करून अतिरिक्त 10 टक्के शुल्क लादण्यात येईल, तसंच कोणत्याही देशासोबत व्यापार थांबवण्यात येईल असं त्यांनी या निर्णयाविरोधात बोलताना पत्रकार परिषदेत सांगितलं.

**<u>भारत-अमेरिका करार</u>**

परस्पर फायदेशीर ठरेल अशा व्यापार कराराला, अंतिम स्वरूप देण्यासाठी भारत आणि अमेरिका काम करत आहेत, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालायचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल नवी दिल्लीत प्रसार मध्यमांशी बोलताना सांगितलं. या संदर्भात, भारतीय  शिष्टमंडळ पुढील आठवड्यात अमेरिकेला भेट देईल, असं ते पुढे म्हणाले.

**<u>इस्त्राएल-लेबेनॉन</u>**

इस्त्रायलनं लेबेनॉनच्या बाका भागात काल केलेल्या हल्ल्यात 10 जणांचा मृत्यू झाला तर सुमारे 24 जण जखमी झाले. जखमींमध्ये 3 मुलांचा समावेश आहे. इस्त्रायलनं पॅलेस्टीनी निर्वासितांच्या छावणीवरही काल हल्ले केले, त्यामध्ये 2 जणांचा बळी गेला आहे. हिजबुल्लाच्या दहशतवाद्यांना लक्ष्य करून हे हल्ले करण्यात आल्याचं इस्त्रायलनं म्हटलं आहे. मात्र हिजबुल्ला कडून कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आलेली नाही.

**<u>मन की बात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या, आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमातून देश आणि परदेशातील लोकांसोबत संवाद साधणार आहेत. सकाळी 11 वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम या मालिकेतील 131 वा भाग आहे. सर्व आकाशवाणी आणि दूरदर्शन केंद्रं, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूजऑन ए आय आर या मोबाईल ॲपवर हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. आकाशवाणी न्यूज, दूरदर्शन न्यूज, पंतप्रधान कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवर देखील त्याचे थेट प्रक्षेपण केले जाईल. हिंदी प्रसारणानंतर प्रादेशिक भाषांमध्ये या कार्यक्रमाचं प्रसारण करण्यात येईल.

**<u>नड्डा-लसीकरण मोहीम</u>**

धनुर्वात आणि घटसर्प या आजारांवरील लसीकरण मोहिमेला, केंद्रीय कुटुंबकल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते आज आरंभ होणार आहे. हिमाचल प्रदेशातील कसौली येथील केंद्रीय संशोधन संस्थेत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. धनुर्वात आणि घटसर्प सारख्या गंभीर आजारांपासून लोकांना संरक्षण देण्यात ही लस महत्त्वाची भूमिका बजावेल.

**<u>इग्नाईट परिषद समारोप</u>**

महानिर्यात इग्नाईट परिषद 2026 चा काल महाराष्ट्रातील पालघरमध्ये समारोप झाला. राज्याच्या निर्यात आणि औद्योगिक क्षमतेमध्ये वृद्धी व्हावी, या उद्देशानं ही परिषद घेण्यात आली होती. 'एक जिल्हा एक उत्पादन' या उपक्रमाद्वारे चिक्कू आणि मासळी यांचा प्रचार करण्यात आला. पालघरमध्ये गेल्या वर्षी 30 हजार कोटी रुपयांहून अधिक मूल्याची निर्यात करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. विविध क्षेत्रातल्या तज्ञांनी निर्यात प्रक्रिया आणि आर्थिक सहाय्याबाबत उद्योजकांना मार्गदर्शन केलं.

**<u>महिला क्रिकेट-आशिया चषक</u>**

भारतीय महिला क्रिकेट संघ ACC आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दाखल झाला आहे. काल बँकॉकमध्ये झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात भारताने श्रीलंका संघाचा 5 गडी राखून पराभव केला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात बांग्लादेशने पाकिस्तानवर 54 धावांनी विजय मिळवला. उद्या, बँकॉकमध्ये, भारत आणि बांग्लादेश संघांत अंतिम लढत होणार आहे.

**<u>टी-20 विश्वचषक</u>**

टी-20 पुरुष विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील 'सुपर एट' अर्थात, पहिल्या आठ संघांतील सामन्यांना आजपासून सुरुवात होत आहे. भारत, वेस्ट इंडिज, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड, झिंबाब्वे आणि पाकिस्तान हे संघ सुपर एट मध्ये दाखल झाले आहेत. या लढतीतीं पहिला सामना, आज संध्याकाळी कोलंबोत, न्यूझीलंड विरुद्ध पाकिस्तान खेळला जाणार आहे. तर, उद्या, अहमदाबादमध्ये भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका लढत होणार आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.